रोहयो अंतर्गत थेट खरेदी पद्धतीने जमीन खरेदी करावयाच्या प्रकरणांमध्ये मोबदल्याची परिगणना करताना केवळ वार्षिक बाजारमुल्य दर (रेडी रेकनर दर) विचारात घेवून मोबदल्याची परिगणना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : रोभूसं-२०१६/प्र.क्र.१८८/रोहयो-८.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ३० नोव्हेंबर, २०१८.

वाचा:- १) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दि.१२ मे,२०१५.
२) शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दि. २५.०१.२०१७.

**प्रस्तावना:**

महसूल व वन विभागाने खाजगी क्षेत्रातील जमीन थेट खरेदी पद्धतीने घेणेबाबत दिनांक १२ मे, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयानुसार थेट खरेदी पद्धतीने जमीन घेण्यासाठी रोहयो अंतर्गत प्रलंबित भूसंपादन प्रकरणी निधी उपलब्ध करून देण्याचे प्रस्ताव प्राप्त होत आहेत.

रोहयो अंतर्गत मोठ्या प्रमाणात भूसंपादन प्रकरणे प्रलंबित आहेत. त्याचे दायित्व मोठे आहे. महसूल व वन विभागाच्या दि.१२ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार थेट खरेदी प्रकरणांसाठी तडजोड करून निधी उपलब्ध करणे विभागाच्या अधिकारातील भाग आहे. सबब, रोहयोच्या प्रलंबित भूसंपादन प्रकरणी शासनाचे आर्थिक दायित्व विचारात घेता, खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने जमीन खरेदी करावयाचे ठरल्यास, मोबदला निश्चित करताना वार्षिक बाजारमुल्य दर (रेडी रेकनरचे दर) विचारात घेवून मोबदल्याची परिगणना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन परिपत्रक :-**

रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रलंबित भूसंपादन प्रकरणी जमीन थेट खरेदी पद्धतीने खरेदी करावयाची असल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) रोहयो अंतर्गत प्रलंबित भूसंपादन प्रकरणांमध्ये, महसूल व वन विभागाच्या दि. १२ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील पद्धतीनुसार थेट खरेदी पद्धतीने जमीन खरेदी करावयाची असल्यास, अशा प्रकरणी मोबदल्याची परिगणना करताना महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम,१९५८ च्या कलम ६९ अन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमुल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ नुसार निर्गमित केवळ वार्षिक बाजारमुल्य दराने (रेडी रेकनर दराने) करण्यात यावी.

२) रोहयोच्या बाबतीत जिल्हाधिकारी हे भूसंपादन यंत्रणा असल्याने, थेट खरेदीची प्रक्रीया जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले भूसंपादन अधिकारी यांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(चि.नि.सुर्यवंशी)
सह सचिव, नियोजन विभाग

प्रत

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री, रोहयो यांचे खाजगी सचिव.
४) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
६) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
७) सर्व विभागीय आयुक्त.
८) सर्व जिल्हाधिकारी.
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१०) सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहायक.
११) सर्व उप सचिव/ अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, रोहयो प्रभाग.
१२) निवड नस्ती/रोहयो-८.